## MAHARASHTRA ACT No. XIV OF 1994,

## THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) (RETROSPECTIVE EXTENSION OF DURATION) ACT, 1993.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १९ जानेवारी १९९४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

## MAHARASHTRA ACT No. XIV OF 1994,

## AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) ACT, 1971 WITH RETROSPECTIVE EFFECT.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक २१ जानेवारी १९९४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

## सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

### महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी ताबडतोब कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अध्यादेश, १९९३ हा दिनांक ७ डिसेंबर १९९३ रोजी प्रख्यापित केला होता ;

१९७१ चा महा. ४७. १९९३ चा महा. अध्या. १९.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमामध्ये रूपांतर करणे इष्ट आहे.; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अधिनियम, १९९३ असे म्हणावे.

(२) तो दिनांक ३० जून १९९३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा. २. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याचे कलम १, पोट-कलम (४) मध्ये "१९९३" या आकड्याऐवजी "१९९४" हा आकडा दाखल करण्यात येईल.

व्यावृत्ती. ३. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही व्यक्ती, तिने १ जुलै १९९३ रोजी सुरू होणाऱ्या आणि ७ डिसेंबर १९९३ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणती कृती ही या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यात आली नसती तर, अपराध नसेल तर, अशा कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धपराध ठरवली जाण्यास पात्र असणार नाही.

शंका दूर करणे. ४. शंका दूर करण्याकरिता, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, दिनांक ३० जून १९९३ नंतर समाप्त होणाऱ्या मुख्य अधिनियमाची मुदत या अधिनियमाद्वारे त्या दिनांकापासून दिनांक ३० जून १९९४ हा दिनांक धरून या दिनांकापर्यंत भूतलक्षी प्रभावाने वाढवल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झाला नसल्याचे मानण्यात येईल व या अधिनियमाद्वारे सुधारण्यात व वाढवण्यात आल्याप्रमाणे असलेल्या, या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधीनतेने अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

सन १९९३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ याचे निरसन व व्यावृत्ती. ५. (१) महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अध्यादेश, १९९३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन करण्यात आलेले असले तरी उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये केलेली कोणतीही कृती किंवा कारवाई (केलेली कोणतीही नियुक्ती किंवा केलेला कोणताही नियम किंवा काढलेला कोणताही आदेश अथवा अधिसूचना यांसह) हा या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या समनुरूप तरतुदींअन्वये केलेली कृती, किंवा कारवाई किंवा नियुक्ती किंवा नियम किंवा काढलेला आदेश अथवा अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद),

प. ग. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.